

सायं दैनिक
नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४५ • रविवार दि.८ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

'गोकुळ'वर कब्जा करण्याचा हेतू नाही-मुख्यमंत्री फडणवीस



मुश्रीफ,कोरे आणि बंटी पाटलांनी एकत्र बसून तोडगा काढावा!

मुंबई/प्रतिनिधी- गोकुळच्या संचालक मंडळातील वादाबाबत मंत्री हसन मुश्रीफ, विनय कोरे-सावकार आणि काँग्रेस नेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी एकत्र बसून आपापसात चर्चा केली आणि या विषयावर तोडगा काढला, तर राज्य सरकारला कोणालाही नियुक्त करण्याची अथवा नामनिर्देशित करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यांनी परस्पर सामंजस्याने हा प्रश्न सोडवून वैधानिक पेच निर्माण होऊ दिला नाही, तर शासन कोणत्याही परिस्थितीत हस्तक्षेप करणार नाही, अशी भूमीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मांडली आहे.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीवरून सुरू असलेल्या राजकीय आणि कायदेशीर वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. गोकुळवर कब्जा करण्याचा राज्य सरकारचा कोणताही हेतू नसल्याचे सांगताना फडणवीस म्हणाले की, सरकारला गोकुळमध्ये कोणालाही पाठविण्यात किंवा तेथील कारभारावर नियंत्रण मिळविण्यात रस नाही. गोकुळ ही सुमारे पाच हजार मतदार असलेली, एका जिल्ह्यापुरती आणि काही तालुक्यांपुरती मर्यादित सहकारी संस्था आहे. अशा एका संस्थेसाठी राज्य सरकार आतुर आहे, असे समजणे चुकीचे आहे. शासनाला केवळ आपली वैधानिक जबाबदारी पार पाडायची आहे.गोकुळच्या बैठका वारंवार कोरमअभावी तहकूब झाल्या असत्या, तर नियमानुसार अधिकार आपोआप जिल्हा उपनिबंधकांकडे (डीडीआर) गेले असते. त्यामुळे सरकारला संस्थेवर कब्जा करायचा असता, तर वेगळे काही करण्याची गरजच नव्हती, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गोकुळसंदर्भात घेण्यात आलेला निर्णय हा कोणत्याही एका राजकीय पक्षाचा नसून शासन म्हणून मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि जनसुराज्य पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी गोकुळमधील वैधानिक पेचप्रसंगाची माहिती दिल्यानंतर हा प्रस्ताव पुढे आला. या प्रकरणात महाधिवक्ता तसेच कायदा व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात आला. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, एकनाथ शिंदे आणि आपण स्वतः अशा तिघांमध्ये चर्चा झाल्यानंतर तिघांच्या स्वाक्षरीने हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामुळे या निर्णयावर शिवसेनेची किंवा महायुतीतील अन्य कोणत्याही घटक पक्षाची नाराजी असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. गोकुळच्या निवडणुकीसंदर्भातील कायदेशीर परिस्थिती स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले की, १० तारखेला पुन्हा कोरम पूर्ण झाला नाही, तर कोरमशिवाय निवडणूक घ्या, असे न्यायालयाने कुठेही म्हटलेले नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यात कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात. गोकुळच्या कायद्यानुसार आणि उपविधींनुसार सलग तीन वेळा बैठक किंवा निवडणूक प्रक्रिया पार पडली नाही, तर संस्थेचे अधिकार जिल्हा उपनिबंधकांकडे जातात आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींचे अधिकारही संपुष्टात येतात. हा वैधानिक पेच **पान ४ वर**

चैतन्यनगर रोडवर चोरट्यांनी पाच जणांना लुटले

सेवानिवृत्त बँक अधिकारी गंभीर जखमी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील चैतन्यनगर ते आसना या मार्गावर शनिवारी पहाटे चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. मॉर्निंगवाकसाठी घराबाहेर पडलेल्या पाच जणांना लुटल्याची घटना घडली. या घटनेत महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी बी.एम. बनसोडे हे गंभीर जखमी झाले आहेत.



तरोडा, चैतन्यनगर व परिसरातील नागरिक हे पहाटेपासूनच शिवमंदिर ते आसना पुल या मार्गावर मॉर्निंगवाकसाठी दररोज पहाटेच घराबाहेर पडत असतात. परिसरात फिरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी असते. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी बी.एम.बनसोडे हे शनिवारी पहाटे घराबाहेर पडले असतांना संत गाडगेबाबा चौकात पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तीन चोरट्यांनी बनसोडे यांना अडविले. चोरट्यांच्या तोंडावर पट्ट्या बांधण्यात आल्या होत्या. त्यांनी बनसोडे यांना मारहाण करुन त्यांच्या पँटच्या खिशाची तपासणी केली. त्यांना काहीच आढळले नाही म्हणून चोरट्यांनी बनसोडे यांच्यावर तिक्ष्ण शस्त्राने वार केला. बनसोडे हे या घटनेत गंभीर **पान ४ वर**



दिवाळीनिमित्त आज असलेल्या लक्ष्मी पूजन साहित्य व इतर खरेदीसाठी नांदेडच्या वेगवेगळ्या भागातील बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. आपआपल्या वाहनाने व ऑटोने नागरिक घराबाहेर पडल्याने शहरातील सर्वच रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी दिसून आली.

तख्त सचखंड गुरुद्वारा येथे तख्त स्नान उत्साहात संपन्न

नांदेड/प्रतिनिधी- तख्त सचखंड श्री हजूर अबिचल नगर साहिब, नांदेड येथे पारंपारिक व धार्मिक परंपरेनुसार शनिवारी 'तख्त स्नान' ची ही पवित्र सेवा अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात संपन्न झाली. या मंगल प्रसंगी देश-विदेशातून आलेल्या हजारो भाविकांनी गुरुचरणी नतमस्तक होऊन सेवेत सहभाग नोंदवीला आहे.

'तख्त स्नान' या परंपरेअंतर्गत भाविकांनी तख्त साहिबच्या अंतर्गत आणि बाहेरील संपूर्ण परिसर दूध आणि पवित्र जलाने स्नान घातले. याचबरोबर सचखंड अंगीठा साहिब येथे सुरक्षित ठेवण्यात आलेली दशमेश पिता श्री गुरु गोबिंदसिंघजी यांची पुरातन व पवित्र शस्त्रे अंगीठा साहिबमधून बाहेर काढून भाविकांच्या दर्शनासाठी मुख्य दिवाण हॉलमध्ये



सजवण्यात आली होती. या सर्व शस्त्रांची धार्मिक मर्यादेनुसार अत्यंत आदराने व पद्धतशीरपणे स्वच्छता व सेवा करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही तख्त साहिबचे मीत जत्थेदार सिंघ साहिब भाई रामसिंघजी यांच्या हस्ते तख्त स्नान प्रारंभतेची अरदास करण्यात आली. त्यानंतर आदरणीय पंच प्यारे साहिबांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी १० वाजता या पवित्र सेवेचा प्रारंभ झाला. घागरियासिंघ आणि उपस्थित भाविकांनी गुरुद्वारा नगीना घाट साहिबच्या पवित्र सरोवरातून पाण्याची घागरे भरून आणल्या आणि तख्त साहिबचा आतील व बाहेरील संपूर्ण परिसर स्वच्छ धुवून निर्मळ केली. या प्रसंगी गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे सचिव स. रवींद्रसिंघ बंगई, बोर्ड सदस्य स. मनप्रीतसिंघ कुंजीवाले, स. गुरमीतसिंघ महाजन तसेच अधीक्षक स. रवींद्रसिंघ कपूर यांनी 'तख्त स्नान' सेवेत सहभागी झालेल्या सर्व भाविकांचे मनापासून आभार मानले. या धार्मिक सोहळ्याला सहायक अधीक्षक स. बलविंदरसिंघ फौजी, सहायक अधीक्षक स. जयमल सिंघ ढिल्लो यांच्यासह गुरुद्वारा बोर्डाचे सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने शीख बांधव सहभागी झाले होते.

राजकीय धूसफूस की,नव्या राजकीय समीकरणाची नांदी?

दिल्लीतील भेटीगाठी, बदलती विधाने आणि नेतृत्वातील संघर्षाने राजकीय गूढ वाढले! महाराष्ट्राचे राजकारण म्हणजे अनपेक्षित वळणांचा अखंड प्रवास! गेल्या अडीच-तीन वर्षात पक्षफुटी, बंडखोरी, सत्तांतर आणि नव्या राजकीय आघाड्यांचे अनेक प्रयोग राज्याने पाहिले. आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकीकरणाच्या चर्चांनी पुन्हा डोके वर काढले आहे. विशेष म्हणजे, या चर्चांना हवा देणारे चेहरे तेच आहेत, ज्यांनी काही दिवसांपूर्वीपर्यंत अशा शक्यता ठामपणे फेटाळून लावल्या होत्या. त्यामुळे राष्ट्रवादीच्या राजकारणात नेमके काय शिजत आहे, हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांच्या आजारपणाच्या निमित्ताने विविध राजकीय नेत्यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. मात्र, सर्वाधिक लक्ष वेधले ते प्रफुल्ल पटेल यांच्या भेटीने. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडल्यानंतर शरद पवारांपासून राजकीयदृष्ट्या दूर गेलेल्या प्रफुल्ल पटेल यांनी तब्बल दीड तास त्यांच्याशी चर्चा केली. ही केवळ आजारपणाची विचारपूस होती की त्यामागे राजकीय चर्चांचे काही सूत्र होते, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत.या भेटीपूर्वी घडलेल्या आणखी काही घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्राताई पवार आणि त्यांचे पुत्र खा.पार्थ पवार यांनी स्वतंत्रपणे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही पक्षाच्या नेत्यांच्या भेटीगाठी झाल्या. मात्र, त्यानंतर सुनेत्राताई आणि पार्थ पवार यांना वगळून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि दिलीप वळसे पाटील या ज्येष्ठ नेत्यांनी अमित शहा यांची स्वतंत्र भेट घेतली. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, याबाबत अधिकृत माहिती स्पष्ट नसली तरी राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. शरद पवारांची राष्ट्रवादी भाजपसोबत जाणार की पटेल, तटकरे, भुजबळ आणि मुंडे यांच्या भाजप प्रवेशाची तारीख निश्चित होणार, अशा चर्चाही रंगू लागल्या. पक्षाने मात्र ही भेट पूर्वनियोजित असून पक्षीय आणि मतदारसंघांशी संबंधित विषयांवर चर्चा झाल्याचे स्पष्टीकरण दिले. त्यामुळे चर्चांचा धुरळा आणि अधिकृत भूमिकेतील अंतर कायम राहिले. दरम्यान, अजित पवारांच्या विमान अपघाती निधनानंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाच्या चर्चांनी वेग घेतला होता. त्यावेळी प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी विलीनीकरणाच्या चर्चांना नकार दिला होता. सुनील तटकरे यांनी तर आमचा पक्ष स्वतंत्र आणि त्यांचा पक्ष स्वतंत्र, अशी भूमिका घेतली होती. प्रदेशाध्यक्ष असल्याने अजितदादांनी आपल्याशी तरी याबाबत चर्चा केली असती, असे सांगत त्यांनी चर्चांनाच पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला होता.मात्र, आता त्याच तटकरेंनी अजितदादांच्या काळात दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू होती, असे मान्य केले आहे. एवढेच नव्हे, तर १२ फेब्रुवारी ही विलीनीकरणाची तारीख निश्चित झाली होती आणि अजितदादा हयात असते तर त्या दिवशी विलीनीकरण झाले असते, असे विधान त्यांनी केले. मग यापूर्वी या चर्चांचा इन्कार का केला जात होता? अजितदादांच्या निधनानंतर राजकीय परिस्थिती बदलली की पक्षातील नेतृत्वाचे गणित बदलले? हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.प्रफुल्ल पटेल आणि शरद पवार यांची भेट, तटकरेंचे बदललेले विधान आणि दिल्लीतील ज्येष्ठ नेत्यांच्या स्वतंत्र भेटी या घटनांचा एकत्रित विचार केला तर राष्ट्रवादीच्या राजकारणात काहीतरी हालचाली सुरू असल्याचे दिसते. मात्र, त्याचा अंतिम परिणाम काय असेल, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. एकीकडे सुनेत्राताई आणि पार्थ पवार यांची भूमिका, दुसरीकडे ज्येष्ठ नेत्यांची भूमिका आणि तिसरीकडे शरद पवारांची राजकीय भूमिका, अशा तीन दिशांनी राष्ट्रवादीचे राजकारण फिरताना दिसत आहे.राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले तर नेतृत्व कोणाचे, पक्षाचे चिन्ह कोणते, सत्तेतील सहभाग कसा आणि महायुतीशी संबंध काय, असे अनेक प्रश्न उभे राहतील. दुसरीकडे ज्येष्ठ नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला तर तो अजितदादांच्या राजकीय वारशाला कोणते वळण देईल, हाही प्रश्न आहे. राजकारणात भेटीगाठी कधीच निरर्थक नसतात; मात्र प्रत्येक भेटीमागे सत्तेचे समीकरणच असते असेही नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांना अंतिम सत्य मानणे घाईचे ठरेल. पण कालपर्यंत विलीनीकरणाचा इन्कार करणारे नेते आज त्याच विलीनीकरणाच्या तारखेची माहिती देत असतील, तर राजकीय धूसफूस असल्याचे नाकारता येणार नाही.राष्ट्रवादीचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार, काही नेते भाजपच्या वाटेवर जाणार की, अजितदादांच्या पक्षातच नेतृत्वाची नवी समीकरणे आकाराला येणार? या प्रश्नांची उत्तरे अजून गुलदस्त्यात आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पडद्यामागे अनेक पट मांडले जात आहेत. या पटावर कोणाची चाल यशस्वी ठरणार आणि कोणाचे राजकीय गणित कोलमडणार, हे येणारा काळच ठरवेल. तूर्त तरी राष्ट्रवादीच्या राजकारणातील धूसफूस नव्या राजकीय समीकरणाची नांदी ठरणार की केवळ चर्चांचा धुरळा, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे!

देशासाठी समर्पित आत्मा म्हणजे संत पाचलेगावकर महाराज!

संत पाचलेगावकर महाराज यांची जयंती ८ नोव्हेंबर रोजी साजरी होत आहे. या निमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा, राष्ट्रभक्तीचा, सामाजिक बांधिलकीचा आणि समाजप्रबोधनाच्या व्यापक कार्याचा आढावा घेणे आवश्यक वाटते. संत पाचलेगावकर महाराज हे केवळ धार्मिक क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व नव्हते, तर देशासाठी समर्पित झालेला एक धगधगता आत्मा होते. धर्माच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती जागृत करणे, समाजातील विखुरलेल्या घटकांना एकत्र आणणे, माणसामाणसांतील भेदभाव दूर करणे आणि राष्ट्रनिर्मितीसाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे, अशी प्रेरणा देणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य होते.

नरक चतुर्दशीच्या दिवशी नरकासुराचा अंत करण्यासाठी भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतल्याची पौराणिक कथा आपण ऐकत आलो आहोत. त्याच प्रतीकात्मक संदर्भातून विचार केला, तर समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय, गुलामगिरी आणि विघटनकारी प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी काही महान व्यक्तिमत्त्वे जन्माला येतात. संत पाचलेगावकर महाराजांचे जीवनकार्यही अशाच व्यापक परिवर्तनाच्या प्रेरणेने जोडलेले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे केवळ संत म्हणून न पाहता राष्ट्रप्रेम, सामाजिक परिवर्तन आणि मानवसेवेचा ध्यास घेतलेल्या एका महान कार्यकर्त्याच्या रूपात पाहिले पाहिजे.भारतावर ब्रिटिशांची सत्ता असताना देशातील जनतेला अनेक प्रकारच्या अन्यायाला आणि अत्याचाराला सामोरे जावे लागत होते. देशाची अस्मिता, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य टिकविण्यासाठी विविध स्तरांवर संघर्ष सुरू होता. महात्मा गांधीजींनी अहिंसा आणि सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारून स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनचळवळीचे स्वरूप दिले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, विनायक दामोदर सावरकर आणि असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या परीने देशासाठी योगदान दिले. या सर्वांच्या त्यागातून आणि संघर्षातून भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक बळकट झाली. स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय संघर्ष नव्हता. तो भारतीयांच्या मनातील गुलामगिरीची भावना नष्ट करून स्वाभिमान जागृत करण्याचा लढा होता. देशातील सामान्य माणसाला राष्ट्र ही संकल्पना समजावून सांगणे, त्याच्या मनात देशाबद्दल आपलेपणा निर्माण करणे आणि समाजाला एकत्र आणणे ही काळाची गरज होती.याच पार्श्वभूमीवर संत पाचलेगावकर महाराजांनी धार्मिक कार्याच्या माध्यमातून राष्ट्रभक्तीचा महायज्ञ सुरू केला. धर्म हा केवळ कर्मकांडापुरता मर्यादित न राहता त्यातून राष्ट्रसेवेची भावना निर्माण झाली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्या विचारांतून राष्ट्रभक्तीचा प्रचार आणि प्रसार झाला. विविध समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. लोकांच्या मनात राष्ट्रीय अस्मिता आणि सामाजिक एकात्मतेची भावना जागृत करण्याचे काम त्यांनी केले. धार्मिक व्यासपीठाचा उपयोग समाजप्रबोधनासाठी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी करता येतो, हे त्यांच्या कार्यातून दिसून येते.आजच्या काळात संत पाचलेगावकर महाराजांचे नाव अनेक ठिकाणी घेतले जाते. जयंती, पुण्यतिथी आणि विविध धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने त्यांचे स्मरण केले जाते. मात्र, त्यांच्या विचारांचा आणि राष्ट्रकार्याचा खरा अर्थ किती जणांनी समजून घेतला आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.

महाराजांच्या जीवनकार्याचे विविध खंड, त्यांचे विचार, त्यांची भाषणे आणि त्यांनी समाजासाठी केलेले कार्य यांचा अभ्यास केला, तर त्यांच्या कार्याची व्याप्ती लक्षात येऊ शकते. त्यांच्या विचारांचा प्रचार केवळ अनुयायांपुरता मर्यादित न ठेवता सर्वसामान्य समाजापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर योग्य सन्मान आणि अभ्यास व्हायला हवा होता, अशी माझी मनापासून भावना आहे. त्यांच्या योगदानाची व्यापक दखल घेण्यासाठी शासन, सामाजिक संस्था आणि अभ्यासकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.अलीकडील काळात काही राजकीय आणि सामाजिक मंडळींकडून महापुरुषांच्या नावाचा उपयोग केवळ निवडणुका किंवा राजकीय स्वार्थ साधण्यासाठी केला जात असल्याचे दिसते. निवडणुकीच्या काळात महापुरुषांचे नाव घ्यायचे, त्यांच्या विचारांचा जयघोष करायचा आणि नंतर त्यांच्या स्मृती, कार्य आणि समाजहिताच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करायचे, ही प्रवृत्ती योग्य नाही. महापुरुषांचे नाव घेणे सोपे असते; मात्र त्यांच्या विचारांनुसार आचरण करणे कठीण असते.संत पाचलेगावकर महाराजांच्या बाबतीतही त्यांच्या कार्याची खरी ओळख समाजासमोर आणण्याची गरज आहे. त्यांचे विचार केवळ व्यासपीठावरून सांगण्याऐवजी ते प्रत्यक्ष कृतीत उतरविणे हीच काळाची मागणी आहे.

संत पाचलेगावकर महाराजांशी माझा अनेक वेळा प्रत्यक्ष संवाद झाला. त्यांच्या भेटी घेण्याचे भाग्य मला लाभले. विविध सामाजिक प्रश्न, अडचणी आणि जनतेच्या समस्या मी त्यांच्या समोर मांडल्या. त्यांच्या सहवासात अनेक महत्त्वाच्या गोष्टी समजून घेण्याची संधी मिळाली. त्यांच्या बोलण्यातून समाजाविषयीची तळमळ, राष्ट्राविषयीची आस्था आणि सामान्य माणसाबद्दलची आत्मीयता जाणवत असे.महाराजांशी झालेल्या संवादातील अनेक अनुभव आजही माझ्या स्मरणात आहेत. मात्र, दुर्दैवाने त्यातील अनेक गोष्टींची व्यवस्थित नोंद झाली नाही. त्या आठवणी आणि विचार इतिहासाच्या पडद्याआड जात आहेत, याचे मनापासून दुःख वाटते. अशा व्यक्तिमत्त्वांचे अनुभव, त्यांचे विचार, त्यांच्याशी संबंधित घटना आणि समाजासाठी केलेले कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक असते. त्यासाठी मौखिक इतिहासाचे संकलन, लेखन, ध्वनिचित्रफिती आणि दस्तऐवजीकरण केले पाहिजे.महाराजांनी समाजाला दिलेली प्रेरणा ही एका विशिष्ट जातीपुरती किंवा धर्मापुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू माणूस आणि राष्ट्र होता. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन देशासाठी आणि समाजासाठी काम करावे, हीच त्यांच्या कार्याची खरी दिशा होती.

आज काही ठिकाणी महाराजांच्या विचारांपेक्षा केवळ धार्मिक कार्यक्रमांना अधिक महत्त्व दिले जात असल्याचे दिसते. धार्मिक भावना वृद्धिंगत करणे चुकीचे नाही; परंतु त्याचबरोबर महाराजांनी दिलेला राष्ट्रभक्तीचा संदेश, समाजप्रबोधन, संघटनशक्ती, माणसे जोडण्याची भूमिका आणि विधायक कार्य यांनाही तितकेच महत्त्व मिळाले पाहिजे.काही ठिकाणी त्यांच्या नावाचा उपयोग करून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची स्पर्धा सुरू झाल्याचे दिसते. महाराजांचे अनुयायी असल्याचा दावा करणे वेगळे आणि त्यांच्या विचारांचे खरे अनुकरण करणे वेगळे. स्वतःचे ट्रस्ट निर्माण करणे, संस्थांच्या माध्यमातून स्वार्थ साधणे आणि महाराजांच्या नावाने समाजात आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, यातून मूळ विचार मागे पडण्याची भीती आहे.महाराजांसारखे व्यक्तिमत्त्व होणे अत्यंत कठीण आहे. त्यांच्या नावाने जगणे सोपे असले, तरी त्यांच्या त्यागाची, समर्पणाची आणि समाजनिष्ठेची उंची गाठणे सोपे नाही. त्यांच्या नावाने भिक्षा मागण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे महत्त्वाचे आहे.एकदा पीपल्स कॉलेजचे प्राचार्य सर गाडगीळ यांनी महाराजांच्या उपस्थितीत केलेल्या भाषणात समर्थ रामदास स्वामींचे उदाहरण दिल्याचे मला स्मरते. समर्थ रामदास स्वामींच्या निधनानंतर त्यांच्या काही शिष्यांनी त्यांच्या नावाचा आधार घेऊन भिक्षा मागण्याची प्रवृत्ती स्वीकारली होती, असा संदर्भ त्यांनी मांडला होता. संत पाचलेगावकर महाराजांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला होता. दुर्दैवाने आज त्यांच्या नावाचा उपयोग करून वैयक्तिक स्वार्थ साधण्याची प्रवृत्ती दिसते, ही बाब आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारी आहे.

महाराजांच्या नावाने एकमेकांमध्ये स्पर्धा, मतभेद किंवा द्वेष निर्माण होत असेल, तर त्याचा उपयोग काय? संघटन म्हणजे माणसे जोडणे; माणसे तोडणे नव्हे. त्यांच्या नावाने होणारे कार्य समाजाला एकत्र आणणारे असले पाहिजे.संत पाचलेगावकर महाराजांच्या कार्याची आठवण करून देणारी एक महत्त्वाची बाब म्हणजे नांदेड शहरातील मगनपुरा परिसरात त्यांनी केलेले श्रमदानाचे कार्य. १९७९ ते १९८४ या कालावधीत त्या भागातील रस्त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट होती. अनेक भाग अविकसित होते. नागरिकांना ये-जा करण्यासाठीही अडचणींचा सामना करावा लागत होता.अशा वेळी महाराजांनी केवळ भाषणातून विकासाचे विचार मांडले नाहीत, तर प्रत्यक्ष श्रमदानाचा मार्ग स्वीकारला. लोकांना सोबत घेऊन रस्ते तयार करण्याचे काम केले. समाजाने एकत्र येऊन आपल्या परिसराचा विकास कसा घडवावा, याचा आदर्श त्यांनी घालून दिला. मी स्वतःही या कार्याशी संबंधित होतो आणि त्या कामात माझे योगदान होते. त्या काळातील श्रमदानाचे महत्त्व आजच्या पिढीने समजून घेतले पाहिजे.आजही त्या रस्त्यांचे महत्त्व आहे. मात्र, एवढे मोठे सामाजिक कार्य करूनही त्या रस्त्यांना संत पाचलेगावकर महाराजांचे नाव देण्याचा निर्णय झालेला नाही, याची खंत वाटते. याबाबत अनेक वेळा संबंधित लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडे विनंती करण्यात आली; परंतु त्यातून अपेक्षित परिणाम झाला नाही.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

ज्या व्यक्तीने आपल्या श्रमातून परिसराच्या विकासाला हातभार लावला, त्यांच्या स्मृती जपण्यासाठी त्या रस्त्याला त्यांचे नाव देणे ही काही मोठी मागणी नाही. ही त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची एक छोटीशी कृती ठरेल. स्थानिक प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.मी स्वतः महाराजांचा एक अनुयायी म्हणून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक अडचणी, संघर्ष आणि यातना सहन करून नांदेड शहरातील वसंतनगर परिसरात महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात आले. हे स्मारक केवळ वास्तू म्हणून उभे राहू नये, तर ते मानवसेवेचे केंद्र बनावे, अशी माझी भावना आहे.या ठिकाणी गरीब, निराधार आणि अनाथ व्यक्तींच्या सेवेसाठी विविध उपक्रम राबविले जातात. समाजातील वंचित घटकांना आधार देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना सन्मानाने जगण्यासाठी मदत करणे, हाच खऱ्या धर्माचा अर्थ आहे.माणसामध्ये देव पाहणे आणि माणसाची सेवा करणे, हीच खरी पूजा आहे. मंदिरात दिवा लावणे, आरती करणे, हार अर्पण करणे यांना निश्चितच धार्मिक महत्त्व आहे; परंतु त्याचबरोबर एखाद्या निराधाराला मदतीचा हात देणे, अनाथ मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारणे, गरीब कुटुंबाला संकटातून बाहेर काढणे आणि दुःखी माणसाच्या चेहऱ्यावर हास्य आणणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. महाराजांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या संस्थांनी या दिशेने अधिक काम करावे. केवळ धार्मिक उत्सवांवर खर्च करण्याऐवजी शिक्षण, आरोग्य, रोजगार, विवाह आणि समाजातील दुर्बल घटकांच्या मदतीसाठी योजनाबद्ध उपक्रम राबविले पाहिजेत.यंदाच्या जयंतीपासून आपण एक सकारात्मक संकल्प करायला हवा. सर्व धर्मीय, सर्व समाजघटक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना सोबत घेऊन सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करावे. विशेषतः अनाथ, निराधार आणि शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या विवाहासाठी संस्थेने पुढाकार घ्यावा.आज अनेक शेतकरी कुटुंबे आर्थिक संकटातून जात आहेत. काही कुटुंबांतील मुला-मुलींचे विवाह केवळ आर्थिक परिस्थितीमुळे रखडतात. अशा कुटुंबांना आधार देणे ही मोठी समाजसेवा ठरेल. विवाह सोहळ्यात कोणत्याही प्रकारचा जातिभेद, धर्मभेद किंवा आर्थिक भेदभाव नसावा. सर्वांना समान सन्मान मिळावा.यासाठी संत पाचलेगावकर महाराजांच्या स्मारक किंवा ट्रस्टच्या माध्यमातून वर्षातून किमान एकदा सार्वजनिक सामूहिक विवाह सोहळा आयोजित करता येईल. त्याचबरोबर गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, अनाथ मुलांच्या संगोपनासाठी योजना, बेरोजगार तरुणांसाठी कौशल्य प्रशिक्षण आणि गरजू कुटुंबांना मदत असे उपक्रमही राबविता येतील.

जयंतीच्या दिवशी केवळ पूजा, पाठ, आरती आणि अन्नदान करून कार्यक्रम संपविण्यापेक्षा एखाद्या विधायक कामाचा प्रारंभ झाला पाहिजे. महाराजांच्या विचारांचा प्रकाश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला, तरच त्यांच्या जयंतीला खरा अर्थ प्राप्त होईल.संत पाचलेगावकर महाराजांच्या जीवनकार्याचे महत्त्व त्यांच्या सहवासात आलेल्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या भेटींमधूनही स्पष्ट होते. शंकरराव चव्हाण यांच्यापासून अनेक आमदार, खासदार, मंत्री, प्रशासकीय अधिकारी, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांची भेट घेतली होती.त्यामध्ये नरहर कुरुंदकर, सुधाकर डोईफोडे, भास्करराव खतगावकर, अशोक चव्हाण, रामजी शेवाळकर, कृष्णप्रकाश, महेश पाटील सुरडकर, चंद्रशेखर भावे, रामरतन सिंह, गोविंदराव चिखलीकर, भुजंगराव किनाळकर, आनंद लाटकर, तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष कुंटूरकर साहेब, ओमप्रकाश पोकर्णा, कोलंबीचे गंभीरबन महाराज आणि जगद्गुरू केदार यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता.या सर्वांनी महाराजांच्या आश्रमाला भेट देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले आणि विविध विषयांवर मार्गदर्शन केले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आकर्षित करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व, समाजाशी असलेली नाळ आणि विचारांची व्यापकता यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या भेटींची, संवादांची आणि अनुभवांची माहिती संकलित करून पुढील पिढीसमोर आणली पाहिजे.

आज महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दुष्काळाचे सावट आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. पाण्याची टंचाई, शेतीतील नुकसान, वाढता खर्च आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाढते दर यामुळे सामान्य माणसाचे जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत आपण सण-उत्सव साजरे करताना सामाजिक जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे.दिवाळी हा आनंदाचा सण आहे. मात्र, आनंद साजरा करताना समाजातील दुःखी आणि गरजू माणसांचा विसर पडता कामा नये. तेल, दूध आणि तुपाचे वाढते दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. त्यामुळे दिवाळीमध्ये अनावश्यक खर्च टाळण्याची गरज आहे.फटाक्यांवर मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करण्याऐवजी तो पैसा एखाद्या गरीब कुटुंबाच्या मदतीसाठी वापरावा. विद्युत रोषणाईवरील अनावश्यक खर्च कमी करावा. पाण्याचा वापर जपून करावा. भविष्यात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.अन्नदान करणे ही चांगली परंपरा आहे; परंतु अन्नाची नासाडी होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. भंडाऱ्यांच्या नावाखाली लाखो रुपये खर्च करण्यापेक्षा मोजक्या प्रमाणात, नियोजनपूर्वक आणि गरजूंना उपयोगी पडेल अशा पद्धतीने अन्नदान करावे. दिवाळीच्या दिवशी गरीब, निराधार, शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये जाऊन त्यांच्यासोबत आनंद वाटावा.

झेंडूच्या फुलांचे साधे हार अर्पण करून, मोजके दिवे लावून आणि उरलेला पैसा समाजोपयोगी कामासाठी वापरूनही आपण दिवाळीचा आनंद घेऊ शकतो. एखाद्या गरीब कुटुंबाच्या घरात आनंदाचा दिवा पेटविणे, एखाद्या अनाथ मुलाला मदतीचा हात देणे किंवा गरजू व्यक्तीच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणे, हीच खरी पूजा ठरेल.संत पाचलेगावकर महाराजांचे जीवनकार्य आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते. धर्म आणि राष्ट्र यांचा संबंध केवळ घोषणांपुरता नसतो. धर्मातून माणुसकी निर्माण झाली पाहिजे, माणुसकीतून समाजसेवा घडली पाहिजे आणि समाजसेवेतून राष्ट्रनिर्मितीला बळ मिळाले पाहिजे.आज त्यांच्या नावाने कार्यक्रम करणाऱ्यांनी स्वतःला काही प्रश्न विचारले पाहिजेत. आपण किती गरीब विद्यार्थ्यांना मदत केली? किती अनाथ मुलांना आधार दिला? किती शेतकरी कुटुंबांच्या अडचणी दूर केल्या? किती बेरोजगार तरुणांना रोजगारासाठी मार्गदर्शन केले? समाजातील जातीय आणि धार्मिक दरी कमी करण्यासाठी आपण काय केले? महाराजांनी पेटविलेली राष्ट्रभक्तीची मशाल पुढे नेण्यासाठी आपण किती योगदान दिले? या प्रश्नांची उत्तरे शोधली, तर जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ लक्षात येईल. महाराजांच्या नावाने केवळ उत्सव साजरे करून, व्यासपीठावर भाषणे देऊन किंवा हार-फुले अर्पण करून आपली जबाबदारी संपत नाही. त्यांच्या विचारांचे आचरण करणे, समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे, सर्वधर्मीय लोकांना एकत्र आणणे आणि राष्ट्रहितासाठी काम करणे हे आपले कर्तव्य आहे.संत पाचलेगावकर महाराज हे एका काळापुरते मर्यादित असलेले व्यक्तिमत्त्व नाहीत. त्यांचे कार्य आणि विचार आजही समाजाला दिशा देऊ शकतात. त्यांच्या नावाचा उपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी करण्याऐवजी त्यांच्या विचारांचे सामाजिक आणि राष्ट्रीय रूपांतर करण्याची गरज आहे.त्यांच्या जयंतीनिमित्त सर्व अनुयायी, सामाजिक संस्था, ट्रस्ट, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी एकत्र येऊन समाजोपयोगी कार्याचा संकल्प करावा. मग तो सामूहिक विवाह सोहळा असो, अनाथ मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी असो, शेतकरी कुटुंबांना मदत असो किंवा पर्यावरण आणि जलसंवर्धनाचे काम असो; प्रत्येक उपक्रमात महाराजांच्या विचारांची प्रेरणा असली पाहिजे.माझी मनापासून इच्छा आहे की, संत पाचलेगावकर महाराजांचे नाव केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या राष्ट्रभक्तीचा इतिहास, सामाजिक योगदान, श्रमदानाची परंपरा आणि मानवसेवेचा संदेश राष्ट्रीय स्तरावर पोहोचला पाहिजे. त्यांच्या कार्याचे योग्य दस्तऐवजीकरण व्हावे, त्यांच्या नावाने झालेल्या सामाजिक कार्याची नोंद व्हावी आणि पुढील पिढीला त्यांच्या विचारांची ओळख व्हावी.

कारण महाराजांना खऱ्या अर्थाने जिवंत ठेवायचे असेल, तर त्यांच्या प्रतिमेची पूजा करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचे आचरण करावे लागेल. त्यांच्या स्मारकावर दिवा लावण्याबरोबरच समाजातील अंधार दूर करण्यासाठीही प्रयत्न करावे लागतील. त्यांच्या नावाने जयघोष करण्याबरोबरच राष्ट्रहितासाठी कृती करावी लागेल.यंदाच्या ८ नोव्हेंबरच्या जयंतीपासून आपण सर्वांनी हीच शपथ घेऊया. गरीबांच्या घरात आनंद निर्माण करूया, जातिभेदाच्या भिंती तोडूया, माणसे जोडूया आणि राष्ट्रसेवेची मशाल पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया.हीच संत पाचलेगावकर महाराजांना माझी मनःपूर्वक आदरांजली आणि हीच त्यांच्या जयंतीची खरी सार्थकता!

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४४८/२०२६
(CNR No.MHND10-001698-2026)

अर्जदार -

१ मिना भ्र.कोंडीबा मेकलवाड — वय-३६ वर्षे — धंदा-घरकाम
२ योगिराज कोंडीबा मेकलवाड अ.पा.क.आई मिना भ्र.कोंडीबा मेकलवाड — वय-०१ वर्षे — -
३ पार्वतीबाई भ्र.विठ्ठल मेकलवाड अर्जदार क्र.१ ते ३ रा.नवरंगपुरा ता.कंधार जि.नांदेड. — वय-७० वर्षे — धंदा-शेती

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं.१ याचे पती व अर्जदार क्र.२ चे वडील व अर्जदार क्र.३ चा मुलगा नामे कोंडीबा विठ्ठल मेकलवाड होते ते दिनांक २०/०९/२०२६ रोजी मयत झाले आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, कोंडीबा विठ्ठल मेकलवाड यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायेदशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत कोंडीबा विठ्ठल मेकलवाड यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत कोंडीबा विठ्ठल मेकलवाड यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०७/१२/२०२६

आज रोजी दि.०४/११/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

विष्णुपुरी,भनगी,वाहेगाव व पिंपळगाव येथील अवैध रेती उपसा घाटांवर पोलीसांच्या धाडी

२ कोटी ३९ लाखांचा ऐवज जप्त





नांदेड/प्रतिनिधी- विष्णुपुरी,भनगी, वाहेगाव व पिंपळगाव निमजी परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी नांदेड ग्रामीण पोलीस व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी शुक्रवारी धाडी टाकुन २ कोटी ३९ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या आदेशावरुन स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग, नांदेड ग्रामीण पोलीसांनी मौजे विष्णुपुरी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी शुक्रवारी पहाटे धाड टाकली. पोलीसांना बघुन रेती उपसा करणाऱ्या तीन आरोपींनी नदीत उड्डया मारुन पोहत नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावरुन पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन एक लोखंडी बोट, एक इंजीन, वीस तराफे, चार ब्रास रेती जप्त केली आहे. याप्रकरणी गजानन हंबर्डे, मनोज नवघरे व अन्य तीन जणांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. लगेच पोलीसांनी मौजे भनगी शिवारातील रेती घाटावर छापा टाकला. घटनास्थळावरुन पोलीसांनी २८ तराफे, ८१ ब्रास रेतीचा साठा पोलीसांनी जप्त केला. याप्रकरणी अज्ञात तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसाच्या एका पथकाने मौजे वाहेगाव शिवारातील घाटावर धाड टाकली. लोखंडी बोट व तराफ्याच्या साह्याने रेती उपसा सुरु होता. पोलीसांना बघून रेती उपसा करणारे नऊ आरोपी पळून गेले आहेत. पोलीसांनी घटनास्थळावरुन चार लोखंडी बोटी, चार लोखंडी छोट्या बोटी, २५ तराफे, पन्नास ब्रास रेतीचा साठा असा पावणे दोन कोटी रुपयांचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पोलीसांनी पिंपळगाव निमजी शिवारातील रेती घाटावर धाड टाकली. गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणारे आरोपी पोलीसांना बघुन पळून जात होते. पोलीसांनी पाठलाग करुन गोविंद प्रल्हाद पुंड रा.पिंपळगाव निमजी यास अटक केली. इतर आरोपी पळून गेले आहेत. रेती उपसा करणारा मुख्य सुत्रधार चांदू व्यंकटी डक हा मजुराच्या साह्याने रेती उपसा करीत असल्याचे निष्पन्न झाले. पोलीसांनी घटनास्थळावरुन एक ट्रॅक्टर, एक रेती उपसा करणारे इंजीन, बारा तराफे, चोवीस ब्रास रेतीचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी गोविंद पुंड, चांदु व्यंकटी डक व अन्य दोन आरोपी यांच्या विरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलीसांनी या चार धाडीत २ कोटी ३९ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

दुचाकी चालकास लुटले

नांदेड/प्रतिनिधी-हदगाव तालुक्यातील वाटेगाव रोडवर शुक्रवारी रात्री दुचाकीवर जाणाऱ्या एका इसमास अडवून लुटल्याची घटना घडली आहे. कल्याण विलासराव जाधव (वय ३८) रा.वाटेगाव हे दुचाकीवर जात असतांना वाटेगाव रोडवर अज्ञात तीन आरोपींनी त्यांची दुचाकी अडविली. चाकुचा धाक दाखवून जाधव यांच्या जवळील लॅपटाप, मोबाईल व रोख रक्कम असा १ लाख रुपयांचा ऐवज हिसकावून घेतला आहे.

...तर,दस्त नोंदणीसाठी पूर्वपरवानगी बंधनकारक

'एक जिल्हा एक नोंदणी' योजनेचा केला जात होता गैरवापर

किनवट/प्रतिनिधी- ज्या तालुक्यातील मालमत्ता असेल त्याच तालुक्यात त्याची दस्तनोंदणी होत असेल तर त्यात पारदर्शकता असते.एक जिल्हा एक दस्त नोंदणी या योजनेचा किनवट तालुक्यातील भूमाफियांनी पुरेपूर गैरफायदा घेत माहूर, हदगाव, भोकर, धर्माबाद आणि नांदेड येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीवर सपाटा लावला होता. आता मात्र त्याला चाप लावण्यात आलाय. याउपरही तालुक्याबाहेर नोंदणी करायची असेल तर, जिल्हा निबंधकांची परवानगी अनिवार्य करण्यात आलीय. यामुळे लफडेखोर भूमाफियांच्या नाकेबंदी होणार असल्याच्या झपाट्याने प्रतिक्रिया उमटायला सुरूवात झाली आहे. किनवट तालुक्यातील मालमत्तांची बाहेर केलेल्या दस्त नोंदणीची चौकशी करण्याच्या मागणीने जोर धरलाय.

तालुक्याबाहेरील दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये किनवट तालुक्यातील शेतजमिनी, ले-आऊटचे भूखंड आणि अन्य मालमत्तांच्या दस्तनोंदण्या करण्यात आल्या त्या दस्त संचिकांची पडताळणी केल्यास भूमाफियांचे कृष्णकृत्य समोर येणार असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. प्रकारांना आळा घालण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे जिल्ह्यातील एका तालुक्यातील मालमत्तेची दुसऱ्या तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तनोंदणी करायची असल्यास संबंधित सहजिल्हा निबंधकांची लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे तालुक्यातील मालमत्तांची भोकर, धर्माबाद, देगलूर आणि हदगाव येथे जाऊन दस्तनोंदणी करण्याच्या प्रकारांना चाप बसेल. तालुक्यातील अनेक मालमत्तांना प्रॉपर्टी रजिस्टर कार्ड (पी.आर.कार्ड) उपलब्ध नसणे, तसेच बोगस गावठाण क्षेत्रातील जमिनींच्या दस्तनोंदणीबाबत तक्रारी आणि संशयास्पद व्यवहार समोर येत असल्याने स्थानिक साहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयात अशा मालमत्तांच्या दस्तनोंदणीवर निबंध घालण्यात आले होते. त्यामुळे काही मालमत्ताधारक आणि व्यवहारातील पक्षकारांनी तालुक्याबाहेरील नोंदणी कार्यालयांचा पर्याय स्वीकारला होता. 'एक जिल्हा एक नोंदणी' योजनेअंतर्गत नागरिकांना जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात फ्लॅट, प्लॉट किंवा जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारांची दस्तनोंदणी करण्याची सुविधा देण्यात आली होती. नागरिकांची सोय, वेळेची बचत आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. परंतु शासन व प्रशासनाच्या पारदर्शकतेला गुंडाळून बोगस कागदपत्रांच्या आधारे नोंदण्या चालूच होत्या. याबद्दल किनवट तालुक्यातून मोठ्या प्रमाणात ओरड सुरू झाल्याने एक जिल्हा एक नोंदणीचा गाशा गुंडाळून आता मालमत्तेच्याच तालुक्यात नोंदणी होणार आहे. बहूतांश दस्त नोंदणीत बोगस कागदपत्रे, सरकारी जमिनी, आरक्षित भूखंड तसेच मालकी हक्काबाबत वाद असलेल्या जमिनींची मूळ तालुक्याबाहेरील कार्यालयांमधून दस्तनोंदणी करून घेण्याचे प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.अशा संशयास्पद व्यवहारांना प्रतिबंध घालण्यासाठी संबंधित विभागाने पूर्वपरवानगीची अट लागू केली आहे. त्यामुळे मालमत्ता व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे.

जाक्र २-क्षेका/नांवाशमनपा/९८६/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०६/११/२०२६

जाहीर प्रगटन

संचिका क्रं.क्षेका.२/NT/१५६००/४०/२६-२७
प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री.**बालाजी पेदन्ना मेटकर** रा.**शिवनगर,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सीटी सर्वे नं.१०७६० पैकी प्लॉट नं.६३ चा भाग** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-२१-१५७१/T,(४०२०१२११२९७), श्रीमती भो/छोटी बी शेख घुडू व ईतर,** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **विक्रीखत क्र.४९४१ दि.०३/०६/२०२५** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नावे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या संबंधात कोणास कांही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

चतुःसिमाः- पुर्वेस- सदरील प्लॉटचा भाग आहे, **पश्चिमेस-** प्लॉट नं.६२ आहे, **दक्षिणेस-**प्लॉट नं.८० आहे, **उत्तरेस-**सदरील प्लॉटचा भाग आहे.

स्वाक्षरित/-
सहाय्यक आयुक्त
क्षेत्रिय कार्यालय-२ अशोकनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १७३/२०२६
सय्यद अखतर व ईतर वि. निरंक
ने. ता. १६/१२/२०२६

अर्जदार:- १. सय्यद अखतर अली पि.सय्यद सादिक अली, वय : ६० वर्षे, धंदा : व्यापार, २. सय्यद सादत अली पि.सय्यद सादिक अली, वय : ५० वर्षे, धंदा : व्यापार, दोघे रा.लेबर कॉलनी नांदेड मो.९६७३४०७१९९, ३. मलेका बेगम भ्र.पाशा शेख, वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम, ४. शफीका बेगम भ्र.अन्सार सय्यद, वय : ६३ वर्षे, धंदा : व्यापार, रा.त्रिमुर्तीनगर, परभणी, ५. अतिखूनिस्सा पि.सादिख अली, वय : ५८ वर्षे, धंदा-घरकाम, रा.लेबर कॉलनी, नांदेड, ६. फरहतुन्निसाबेगम भ्र.मिर्झा फारुक बेग, वय : ५४ वर्षे, धंदा-घरकाम, रा.फतेह बुरुज, किल्ला रोड, ईतवारा, नांदेड, ७. तय्यबा भ्र.शहाजहान, वय : ४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा.प्लॉट नं.२७, खतगाव ता.कमलनगर, औराद जि.बिदर, ८. रेश्मा अंजुम भ्र.सय्यद अफसर अली, वय : ५० वर्षे, धंदा - घरकाम, ९. सय्येदा ईरम रुखसार पि.सय्यद अफसर अली, वय : ३४ वर्षे, धंदा - घरकाम, १०. सय्येदा दुर्दे अफशान पि.सय्यद अफसर अली, वय : ३० धंदा : घरकाम, ११. सय्यद अहसन अली पि.सय्यद अफसर अली, वय : २८ वर्षे, धंदा : व्यापार, सर्व रा.लेबर कॉलनी नांदेड मो.७०२०९२८१९८
विरुध्द
गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत सय्यद सादिक अली पि.सय्यद अहमद अली व मयत अखेला बेगम भ्र.सय्यद सादिक अली यांचा मृत्यु अनुक्रमे दिनांक २९/०६/२००५ व दिनांक ०८/०९/२०२३ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ व २ हे मयताची मुले असून अर्जदार क्र.३ ते ७ ह्या मुली आहेत. अर्जदार क्र.८ ही मयताची सुन व अर्जदार क्र.९ ते ११ हे नातवंडे आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ व ११ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १६/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील श्रीमती के.एच.लोहगावकर, प्रथम वर्ग
न्यायदंडाधिकारी,अर्धापुर यांच्या न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१८९/२०२६

अर्जदार - बालाजी पि.गोविंद खंडागळे वय-४० वर्षे, धंदा-मजुरी रा.बारसगाव ता.अर्धापुर जि.नांदेड आधार क्र. ७५९३८५५९७८०७
विरुध्द
गैरअर्जदार - मा.ग्रामविकास अधिकारी साहेब ग्रामपंचायत कार्यालय,बारसगाव ता.अर्धापुर जि.नांदेड

विषय - कलम १३ (३-अ) जन्म/मृत्यू अधिनियम दुरुस्ती २०२६ अन्वये

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार बालाजी पि.गोविंद खंडागळे जन्म दि.११/१२/१९८६ रोजी राहत्या घरी मौजे बारसगाव ता.अर्धापूर जि.नांदेड येथे जन्म झाला आहे. त्यासंबंधीचे कागदपत्र अर्जदाराने प्रकरणात दाखल केले आहेत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.२३/१२/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक : ०७/११/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
अर्धापुर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अर्धापूर

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४४५/२०२६
(CNR No.MHND10-001640-2026)

अर्जदार -

१ काश्याबाई भ्र.संभाजी कदम वय-४३ वर्षे धंदा-घरकाम
२ पवन पि.संभाजी कदम वय-२३ वर्षे धंदा - शेती
दोघे रा.औराळ ता.कंधार जि.नांदेड
३ ऐश्वर्या भ्र.विनायक सुर्यवंशी वय-२८ वर्षे धंदा-घरकाम
रा.लामकानी पो.हाळदा ता.भोकर जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं.१ याचे पती व अर्जदार क्र.२ व ३ चे वडील नामे संभाजी व्यंकटराव कदम होते ते दिनांक ०१/०९/२०२६ रोजी मयत झाले आहे. व मयताची आई नामे पदमीनबाई व्यंकटराव कदम ह्या यापुर्वीच मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, संभाजी व्यंकटराव कदम यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत संभाजी व्यंकटराव कदम यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत संभाजी व्यंकटराव कदम यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०५/१२/२०२६

आज रोजी दि.०४/११/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील श्रीमती के.एच.लोहगावकर, प्रथम वर्ग
न्यायदंडाधिकारी,अर्धापुर यांच्या न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३३/२०२६

अर्जदार - नबीसाब पि.शमशुमिया शेख वय-३७ वर्षे, धंदा-नोकरी रा.सावरगाव ता.अर्धापूर जि.नांदेड
विरुध्द
गैरअर्जदार - जन्म मृत्यू नोंदणी निबंधक/ग्राम सेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सावरगाव ता.अर्धापुर जि.नांदेड

विषय - जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम,२००६ कलम १३ ३ (अ) अन्वये.

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नबीसाब पि.शमशुमिया शेख जन्म दि.१०/०७/१९८८ (अक्षरीः दहा जुलै एकोन्नीशे अठ्ठ्यांशी) रोजी राहत्या घरी सावरगांव ता.अर्धापूर जि.नांदेड येथे जन्म झाला आहे. त्यासंबंधीचे कागदपत्र अर्जदाराने प्रकरणात दाखल केले आहेत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.०३/१२/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक : २१/१०/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
अर्धापुर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अर्धापूर

जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण,६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७२९/२०२६
गणपत व इतर विरुध्द निरंक

अर्जदार - गणपत पि.विठ्ठलराव सोनाळकर वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी,२. समर्थ पि.गणपत सोनाळकर वयः १७ वर्षे, धंदा : शिक्षण अ.पा.क.वडील अर्जदार क्र.१ दोघे रा.बेलानगर, तरोडा खु., नांदेड
विरुध्द
गैरअर्जदार - निरंक

दावा - बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत मीना रामलू चीनमलवार यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ हे त्यांचे पती व अर्जदार २ हा त्यांचा मुलगा आहे. त्यांचा मृत्यू दिनांक १०/०७/२०२६ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत मीना रामलू चीनमलवार यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत या न्यायालयात दिनांक १०/१२/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
६ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड

जाहीर प्रगटन

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५९९/२०२६
निकीता विरुद्ध वैद्यकीय अधिकारी नांदेड

अर्जदार : निकीता भ्र.गोवर्धन राठोड वय : २७ वर्ष, धंदा : घरकाम, रा.शक्तिनगर, इतवारा नांदेड ता.जि.नांदेड

गैरअर्जदार : वैद्यकीय आरोग्य अधिकारी निबंधक तथा जन्म मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी नांदेड नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

दावा : जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज

या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार निकीता भ्र.गोवर्धन राठोड वय २७ वर्ष, धंदा घरकाम रा.शक्तीनगर इतवारा नांदेड ता.जि.नांदेड याने या रा. त्यांचा मुलगा नामे क्रिशीब गोवर्धन राठोड यांच्या जन्म नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने क्रिशीब गोवर्धन राठोड याचा जन्म दिनांक ०४/०७/२०२४ रोजी मौजे शक्तीनगर इतवारा नांदेड येथे झाला असे नमूद केले आहे.

सदर अर्जदाराला क्रिशीब गोवर्धन राठोड याचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १४/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७.१२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
लिपीक फौजदारी विभाग
३ रे फौजदारी न्यायालय,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय,नांदेड

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,लोहा जि.नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ अर्ज क्रमांक २१०/२०२६

अर्जदार - संदिप पि.आनंद तोनचिरे, वय : ३० वर्षे, धंदा : शिक्षण, रा.हाडोळी (ज) ता.लोहा जि.नांदेड
विरुध्द
गैरअर्जदार - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हाडोळी (ज), ता.लोहा जि.नांदेड

विषय - १३ (३) (अ) जन्म, मृत्यु नोंदणी अधिनियम अन्वये जन्म/मृत्युची नोंद घेणेसाठी आदेश देणे बाबत.

महोदय,

अर्जदारा तर्फे खालील प्रमाणे विनंती अर्ज सादर करण्यात येत आहे.

१. हे की, ज्याअर्थी अर्जदार हे ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हाडोळी (ज) ता.लोहा जि.नांदेड यांच्याकडे जाऊन अर्जदार नामे संदिप पि.आनंद तोनचिरे याचा जन्म दिनांक १५/०५/१९९६ रोजी मौजे हाडोळी (ज) ता.लोहा जि.नांदेड येथे अर्जदाराच्या घरी जन्म झाला आहे. परंतु अनावधानाने अर्जदाराच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराकडे घेण्यात आलेली नाही.

२. हे की, त्यामुळे अर्जदाराने त्यांचे वकीला मार्फत या कोर्टात कलम १३ (३) (अ) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम अन्वये अर्जदाराच्या जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हाडोळी (ज) ता.लोहा जि.नांदेड यांना आदेश देण्या बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

३. हे की, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हाडोळी (ज) ता.लोहा जि.नांदेड येथे अर्जदारांच्या जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश देणे बाबत जर कुणाचा आक्षेप अथवा उजर असेल. त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर या मा.कोर्टात दिनांक २८/१२/२०२६ रोजी पर्यंत दाखल करावा. अन्यथा अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात येते.


आदेशावरुन

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
फौजदारी न्यायालय लोहा

स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
फौजदारी न्यायालय लोहा

पाण्याअभावी हतबल झालेल्या शेतकऱ्यांचा रोपे नेण्यास नकार

रायखोड येथील जय किसान हायटेक नर्सरीमधील रोपे वाळून गेल्याने लाखोंचे नुकसान



भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील मौजे रायखोड येथील जय किसान हायटेक नर्सरी मधील रोपांमुळे मागील तीन वर्षात शेतकऱ्यांना मोठा लाभ झाला मात्र चालूवर्षी पाऊस अत्यंत कमी झाल्यामुळे शेतीला पाणीच नाही, शेतकऱ्यांनी बुकिँग केलेली रोपे नेण्यास नकार दिल्याने नर्सरी मधील अनेक प्रकारची रोपे वाळवून गेली यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

भोकर तालुक्यातील रायखोड येथील माजी उपसभापती तथा तरुण कृषीनिष्ठ शेतकरी सुरेश बिल्लेवाड यांनी अत्याधुनिक पद्धतीने नवीन तंत्रज्ञानानुसार अभ्यास करून तीन वर्षांपूर्वी नर्सरी सुरू केली अनेक जातीची रोपे फळबागांची रोपे त्यांनी तयार करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा लाभ झाला मात्र चालू वर्षी पाऊसच कमी झाल्यामुळे शेतातील विहिरींना पाणीच राहिले नाही त्यामुळे रोपांची बुकिँग केलेल्या शेतकऱ्यांनी रोपे नेण्यास नकार दिल्याने जय किसान हायटेक नर्सरी मधील लाखो रुपयांची रोपे वाळून गेली सुरेश बिल्लेवाड यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले, वेळेत रोपांची लागवड झाली नाही तर त्यांचा काही उपयोग होत नाही म्हणून रोपे रस्त्यावर फेक्न द्यावी लागली.चालू वर्षी पाऊस चांगला होईल या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी जय किसान नर्सरी येथे आगाऊ बुकिँग केली होती त्यानुसार अनेक प्रजातीची रोपे तयार करण्यात आली मात्र सप्टेंबर महिन्यापर्यंत पाऊसच झाला नसल्याने भाजीपाला व इतर प्रकारचे रोपे लावायची कशी हा प्रश्न शेतकऱ्यासमोर निर्माण झाल्याने बुकिँग केलेली रोपे शेतकऱ्यांनी नेण्यास नकार दिला.टोमॅटो, मिरची, कोबी, वांगे यासह अनेक भाजीपाल्यांची रोपे व आंबा पेरू लिंबू अशा फळझाडांची रोपेही उत्तम प्रकारे तयार झाली होती. पावसाअभावी विहिरी बोरवेल कोरडे पडल्यामुळे शेतकऱ्यांपुढे भीषण संकट उभे राहिले आणि रोपांची दिलेली ऑर्डर शेतकऱ्यांनी रद्द केली. नर्सरी मधील कोवळी रोपे वाळून खराब झाली.रोपे वाचवण्याच्या धडपडीत देखभालीचा व पाण्याचा खर्च दुप्पट झाला रोपे जिवंत ठेवण्यासाठी सुरेश बिल्लेवाड यांनी टँकरने महागडे पाणी विकत घेतले मात्र पाणीटंचाई आणि कोरडे हवामानामुळे रोपे टिकू शकली नाहीत, बियाणे,खत,मजुरी पाण्याचा खर्च याचा मोठा आर्थिक फटका बसला मूळ भांडवल सुद्धा निघाले नाही. बँकेकडून मोठे कर्ज काढून हा व्यवसाय उभा करण्यात आला होता मात्र घेतलेल्या कर्जाचा बोजा तसाच वाढत गेला, कर्जाचे हप्ते फेडण्याचे नियोजन बिघडून गेले. निसर्गाच्या लहरीपणामुळे कृषी पूरक असणारा व्यवसाय पूर्णपणे उध्वस्त झाला असून आता शासनाकडून मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे अशा कोरड्या दुष्काळात अहोरात्र कष्ट करून वाढवलेली रोपे वळून गेली. अशा कठीण परिस्थितीत शासनाने कृषी व्यवसायिकाला आर्थिक मदतीचा हात द्यावा अशी आर्त हाक सुरेश बिल्लेवाड यांनी दुःखी भावनेतून व्यक्त केली आहे.

दहावी-बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

पुणे:राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली असून, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या बोर्ड परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२७ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७ दरम्यान होणार आहे. मंडळाने यासंदर्भातील अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले असून, विद्यार्थ्यांना मंडळाच्या संकेतस्थळावर परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक पाहता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षांसह प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षांचेही नियोजन जाहीर करण्यात आले आहे.बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. तर दहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानंतर नियोजित वेळापत्रकानुसार लेखी परीक्षांना सुरुवात होईल.दरम्यान, अंतिम वेळापत्रक जाहीर झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करणे शक्य होणार आहे.

खा.पार्थ पवार सिल्वरओकवर;अनेकांची भेटीसाठी गर्दी

शरद पवारांना रुग्णालयातून डिस्चार्ज



मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांना शनिवारी (दि. ७ नोव्हेंबर) मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. सध्या ते मुंबईतील सिल्वरओक या आपल्या निवासस्थानी दाखल झाले आहेत. दिवंगत अजित पवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र खा.पार्थ पवार यांनी सिल्वरओकवर जावून त्यांची भेट घेतली. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस व इतर नेत्यांच्या ते भेटी घेत आहेत. त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

दुष्काळ भागांचा पाहणी दौरा करीत असतांना त्यांना छातीत दुखणे, खोकला आणि कफाचा त्रास जाणवल्याने त्यांना २ नोव्हेंबर रोजी पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना मुंबईत पुढील उपचारांसाठी आणण्यात आले होते. ब्रीच कँडी रुग्णालयात दोन दिवस तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. उपचारांना चांगला प्रतिसाद मिळाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. दरम्यान सिल्वरओकवर येताच खा.पार्थ पवार, आ.जितेंद्र आव्हाड यांच्यासह अनेक नेत्यांनी त्यांची भेट घेवून प्रकृतीची आस्थेवाईकपणे चौकशी केली. दरम्यान यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, संजय राऊत यांच्यासह अनेक नेत्यांनी रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.

किनवट बाजार समितीतील भरती अन् जमीन विक्रीचे गौडबंगाल उघडणार?

उच्च न्यायालयाच्या आदेशाने चौकशी समिती गठित

किनवट/प्रतिनिधी-किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित बेकायदेशीर पदभरती आणि जमीन विक्रीतील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी अखेर विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडून चार सदस्यांची विशेष चौकशी समिती गठित करण्यात आलीय. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशावरून ही प्रशासकीय कारवाई करण्यात आली असून, समितीला १५ दिवसांच्या आत सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बाजार समितीच्या आर्थिक गडबड घोटाळ्याच्या रणकंदनातून आणखी काय काय घडामोडी घडतील आणि त्यातून नक्कीच कारवाई होणार काय ? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन सभापती गजानन गोविंदराव मुंडे यांनी यासंदर्भात तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये त्यांनी ३० जून २०२६ रोजी पणन मंत्र्यांकडे निवेदन देऊन बाजार समितीतील गैरव्यवहारांकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका (क्र. १३७३०/२०२६) दाखल केली होती. या याचिकेवर १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सुनावणी करताना उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या निवेदनावर गुणवत्तेनुसार (On Merits) ८ आठवड्यांच्या आत योग्य निर्णय घेण्याचे आदेश विभागीय सहनिबंधक कार्यालयाला दिले होते. न्यायालयाच्या या आदेशानुसार विभागीय सहनिबंधक कार्यालयात सर्व संबंधितांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अर्जदारांनी पूर्वीच्या लेखापरीक्षकांऐवजी दुसऱ्या निष्पक्ष लेखापरीक्षकांकडून ०१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीतील लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याची मागणी केली. तसेच त्यांचा मुख्य आक्षेप बाजार समितीतील संशयास्पद पदभरती व जमीन विक्रीवर असल्याचे स्पष्ट केले.या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेत लातूरचे विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी चौकशी समितीची घोषणा केली आहे. या समितीत हदगावचे सहायक निबंधक एस.जी. गन्लेवार, नांदेडचे सहायक निबंधक (प्रशासन) ए.डी. भागानगरे, नांदेडचे विशेष लेखापरीक्षक (वर्ग-२) जे.पी. बनसोड आणि विशेष लेखापरीक्षक (श्रेणी-२) बी.एम.चव्हाण यांचा समावेश आहे.ही चौकशी समिती १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीतील सर्व व्यवहारांचे फेर-लेखापरीक्षण करणार असून, बेकायदेशीर पदभरती आणि जमीन विक्रीतील कथित गैरव्यवहाराची पाळेमुळे शोधून काढणार आहे. चौकशी समितीला १५ दिवसांच्या मुदतीत सर्व आनुषंगिक कागदपत्रांसह व स्वयंसस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या उच्चस्तरीय चौकशीमुळे किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील प्रशासकीय व राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.



मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील नवनिर्वाचित आ.डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्यावतीने एका कार्यक्रमात माजी मंत्री कमलकिशोर कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री सुर्यकांता पाटील, माजी मंत्री डॉ.माधवराव किन्हाळकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



पान १ वरुन

'गोकुळ'वर कब्जा करण्याचा...

टाळण्यासाठीच काही व्यक्तींना नामनिर्देशित करून त्यांना मतदानाचा अधिकार देण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे. कोरम पूर्ण होऊन निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी, या गोकुळ निवडणुकीला राजकीय रंग देणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. गोकुळ ही चांगली आणि महत्त्वाची सहकारी संस्था असली, तरी तिच्या निवडणुकीचा राज्याच्या राजकारणावर कोणताही परिणाम होत नाही. या विषयाला राजकीय रंग देणे योग्य नाही, असे फडणवीस म्हणाले. गोकुळच्या निवडणुकीनंतर झालेल्या शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत बंटी पाटील यांचे उमेदवार चौथ्या क्रमांकावर गेले, तर भाजपचा उमेदवार विजयी झाला, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. सध्या काँग्रेसची परिस्थिती अशी झाली आहे की, एका सहकारी संस्थेच्या निवडणुकीलाही राष्ट्रीय मुद्दा बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी टीका त्यांनी केली. माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दिलेले मत हे बंटी पाटील यांनी त्यांच्यासमोर मांडलेल्या माहितीच्या आधारे असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. त्या मताच्या शेवटच्या परिच्छेदात समोर उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या आधारेच हे मत व्यक्त करण्यात येत असल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. गोकुळमध्ये कोरम पूर्ण होत नसल्यामुळे निवडणूक घेता आलेली नाही आणि दोन्ही गटांकडे आवश्यक कोरमइतके संख्याबळ नाही, ही वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली नव्हती, असेही त्यांनी सांगितले.

जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील श्रीमती के.एच.लोहगावकर, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,अर्धापुर यांच्या न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५४/२०२६
अर्जदार - भिमराव पि.सटवाजी नरवाडे वय-६५ वर्षे, धंदा-मजुरी रा.लोणी खु.ता.अर्धापुर जि.नांदेड
विरुध्द
गैरअर्जदार - जन्म मृत्यू नोंदणी निबंधक/ग्राम सेवक, पंचायत कार्यालय,लोणी खु.ता.अर्धापुर जि.नांदेड
विषय - जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम,२०२६ कलम १३ ३ (अ) अन्वये.

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार भिमराव पि.सटवाजी नरवाडे यांचे वडील सटवाजी पि.नामदेव नरवाडे मृत्यू दि.०७/०२/२००४ रोजी राहत्या घरी लोणी खु.ता.अर्धापुर जि.नांदेड येथे झाला आहे. त्यासंबंधीचे कागदपत्र अर्जदाराने प्रकरणात दाखल केले आहेत. तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.१५/१२/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक : ०३/११/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अर्धापुर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अर्धापुर

चैतन्यनगर रोडवर...

जखमी झाले. त्यानंतर चोरट्यांनी देशमुख जिम समोर एका तरुणाचा मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. सांगवी पाटी जवळील सिध्दार्थनगर येथे चोरट्यांनी ट्रॅक्टर चालकास अडविले. ट्रॅक्टर चालक सोनवणे यांना चाकुचा धाक दाखवून एक हजार रुपये जबरदस्तीने काढून घेवून चोरटे दुचाकीवर निघून गेले. आसना नदी पुलाजवळ भाजीपाला विक्रीसाठी घेवून येणाऱ्या शेतकऱ्याला चोरट्यांनी अडवून त्याच्या जवळील ८०० रुपये व मोबाईल हिसकावून घेतला आहे. त्यानंतर रेल्वे डिव्हीजन समोर एका दुचाकी चालकास अडवून मारहाण केल्याची घटना घडली. एका तासात लुटमारीच्या पाच घटना घडल्याने सकाळी मॉर्निंगवाकसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दोन ते तीन दिवसांपूर्वीच ज्येष्ठ पत्रकार व तरोड्याचे माजी सरपंच आनंदराव कल्याणकर यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांची भेट घेवून चैतन्यनगर ते आसना पुल या भागात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आणुन दिले. या मार्गावर पोलीस बंदोबस्त वाढविण्याची मागणी त्यांनी केली होती.

विधीसंघर्षीत बालकास अटक

चैतन्यनगर रोडवर शनिवारी लुटमारीच्या घटने प्रकरणी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने एका सतरा वर्षीय विधीसंघर्षीत बालकास बोंढार बायपास रोडवरील शेतातून अटक केली आहे. इतर दोन आरोपी पळून गेले आहेत. विधीसंघर्षीत बालकाची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने प्रज्वल उर्फ ऋषी वाठोरे व शेख गौस शेख माजीद रा.माळटेकडी,नांदेड यांच्या सोबत सदरील गुन्हे केल्याची माहिती दिली. पोलीसांनी दोन्ही फरार आरोपींचा शोध सुरु केला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४